“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2021-22 – PART 2

सकाळ

शुक्रवार,
२४ डिसेंबर २०२१




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळेत बोलताना वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक विकास अडसूळ.

# डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात वाहतुकीचे नियम आणि वाहन परवाना या विषयावर कार्यशाळा पार पडली. एनएसएस आणि एनसीसी विभागातर्फे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक विकास अडसूळ यांनी मार्गदर्शन केले. नवीन वाहतूक कायदा, वाहतूक परवाना काढताना आवश्यक कागदपत्रे याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रा. अरुण कटकोळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी आभार मानले. या वेळी प्रबंधक डी. एम. लोकरे, प्रा. गोडबोले, प्रा. साठे, प्रा. मेजर मोहन विरकर यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
शुक्रवार, दि. २४ डिसेंबर २०२१


# भित्तीपत्रकाचे उद्घाटन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात गणित विभागाच्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. एस. टी. सुतार यांनी केले. यावेळी एम. एम. कांबळे, डॉ. व्ही. बी. गणबावले, वृषाली हत्तरगी, सुप्रिया पाटील आदी उपस्थित होते. आभार डी. जे. मुंगारे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
२७ डिसेंबर २०२१




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात रसायनशास्त्रच्या प्रयोगशाळा उद्‍घाटनप्रसंगी बोलताना शशांक बावचकर.

# रसायनशास्त्राची प्रयोगशाळा सुरू

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रयोगशाळा उद्‍घाटन झाले. काँग्रेसचे प्रदेश सचिव शशांक बावचकर, अमृतमामा भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. चालू शैक्षणिक वर्षांपासून महाविद्यालयात रसायनशास्त्र अधिविभागाला मंजुरी मिळाली असून, ऑरगॅनिक केमिस्ट्री या अभ्यासक्रमास सुरुवात झाली आहे. यासाठी लागणारी प्रशस्त प्रयोगशाळा बनवली. या प्रयोगशाळेचे उद्‍घाटन झाले. वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे ही काळाची गरज असल्याचे मत श्री. बावचकर यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. स्वागत व प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. ए. घारे यांनी केले. आभार प्रा. डॉ. ए. एस. तपासे यांनी मानले. प्रा. डी. ए. यादव, प्रा. डी. जे. मुंगारे, प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. एम. बी. पाटील, प्रा. सौरभ मोरे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत

epaper.lokmat.com 3

र, मंगळवार, दि. २८ डिसेंबर २०२१

## 'डीकेएएससी'त प्रयोगशाळेचे उद्घाटन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात रसायनशास्त्र अधिविभाग प्रयोगशाळेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. यावेळी कॉंग्रेसचे प्रदेश सचिव शशांक बावचकर व अमृत भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. ए. ए. घारे यांनी स्वागत केले. डी. ए. यादव, डी. ए. मुंगारे, प्रा. मेजर मोहन वीरकर, एम. बी. पाटील आदी उपस्थित होते. ए. एस. तपासे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ - ३०/१२/२०२१



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

## 'डीकेएएससी'च्या खेळाडूंचे यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील खेळाडूंनी आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत यश मिळवले. संतोषी फातले हिने ६४ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. तिची गुंटूर (आंध्रप्रदेश) होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच तलवारबाजी स्पर्धेत प्रणव रावळ यांनी उत्कृष्ट कामगिरी करत कास्यपदक पटकावले. त्याची अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ३० डिसेंबर २०२१

# ‘विवेकानंद’ला सर्वसाधारण विजेतेपद

## मध्यवर्ती युवा महोत्सव : ‘लोककले’त कऱ्हाड, लोकनृत्यात सांगलीची बाजी

**महागाव, ता. २९ :** शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद महाविद्यालयाने पटकावले. सलग दोन वर्षे महाविद्यालयाने या चषकावर नाव कोरले आहे. लोककला विभागात कऱ्हाडच्या सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाने, तर लोकनृत्यात सांगलीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाने बाजी मारली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण झाले.



चिंचेवाडी : मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या जनरल चॅम्पियनशिपचे पारितोषिक डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक.

चिंचेवाडी (ता. गडहिंग्लज) येथील संत गजानन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या कॅम्पसमध्ये तीन दिवस चाललेल्या युवा महोत्सवाची डॉ. शिर्के यांच्या उपस्थितीत आज सांगता झाली.

समूहाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. डॉ. आण्णासाहेब चव्हाण अध्यक्षस्थानी होते. दरम्यान, या महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ६८ महाविद्यालयांचे एक हजार ३३० विद्यार्थी सहभागी झाले होते. एकूण पाच विभागातील ३२ कला प्रकारांत विद्यार्थ्यांनी कला सादर केली. ९४ परीक्षकांनी तयार केलेला निकाल आज जाहीर केला.

या वेळी डॉ. शिर्के यांनी युवा महोत्सवाचे नेटके संयोजन केल्याबद्दल संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कौतुक केले. लोककला व लोकसंस्कृती टिकून राहावी, म्हणून विद्यार्थ्यांना साठ प्रकारातील वाद्यांचा संच विद्यापीठ उपलब्ध करून देणार आहे. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी लवकरच अभिनय क्षेत्रात करिअर करणाऱ्यांसाठी फिल्म अभिनय सर्टिफिकेट या नवीन कोर्सची सुरुवात करणार असल्याचे सांगितले. अभिनेते राहुल मगदूम यांनी नवोदित कलाकारांनी करिअरची सुरुवात नाटकापासून करण्याचे आवाहन केले. ॲड. आण्णासाहेब चव्हाण, विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, गोकुळ संचालक अजित नरके यांची भाषणे झाली. दरम्यान, संस्थाध्यक्ष ॲड. चव्हाण यांच्या शेगाव ते महागाव पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास डॉ. यशवंत चव्हाण, सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, प्रा. व्ही. एम. पाटील, डॉ. व्ही. वाय. कदम, डॉ. डी. जी. चिघळीकर, डॉ. डी. व्ही. ताम्हणकर आदी उपस्थित होते. प्रा. एस. बी. पोवार यांनी आभार मानले.

### विभागनिहाय इतर निकाल

● **नृत्य विभाग :** विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर ● **नाट्य विभाग :** दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी ● **संगीत विभाग :** विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर ● **कला विभाग :** दत्ताजीराव कदम इचलकरंजी ● **वाङ्मय विभाग :** न्यू कॉलेज, कोल्हापूर, डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव (विभागून).

Scanned with CamScanner

पुण्य नगरी
शनिवार, १ जानेवारी २०२२

# विवेकानंद कॉलेजला विजेतपद

**महागाव : वार्ताहर**

संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये आयोजित ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सांघिक स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने पटकावला, तर सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कराडने पटकावला, तसेच सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक डॉ. पतंगराव कदम कॉलेज सांगलीने पटकावला.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरते गौरव चषक नृत्य विभागात विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, नाट्य विभागात दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, संगीत विभागात विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने, कला विभागात दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, वाङ्मय विभागात दि न्यू कॉलेज कोल्हापूर व डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव यांना विभागून पारितोषिक देण्यात आले, तर प्रथम कुलगुरू स्व. डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक व अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने पटकावला.

Scanned with CamScanner

दै. सकाळ ४ जाने. २०२२.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त.

## डिकेएएससी महाविद्यालय

इतिहास विभाग, एनएसएस व एनसीसी विभाग यांच्या वतीने स्वाती कृष्णन यांचे 'लिंग समानता समजून घेऊया' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे होते. प्रास्ताविक व स्वागत डॉ. एस. जे. वेल्हाळ यांनी केले. आभार कुमारी सुश्मिता वडेर यांनी मानले. सूत्रसंचालन कुमारी राधिका शर्मा हिने केले. मेजर विरकर, प्रा. अरुण कटकोळे आदी उपस्थित होते.

## युवा महोत्सवात डीकेएएससीची बाजी

इचलकरंजी, ता. ३ : डीकेएएससी कॉलेजने शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये यश मिळवले. नाट्य आणि कला विभागामध्ये सर्वसाधारण विजेतेपद पटकावून फिरत्या गौरव चषकावर नाव कोरले. वैयक्तिक व सांघिक अशा नऊ प्रकारांत पारितोषिक मिळवली. एकांकिका स्पर्धेत सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनयाचे पारितोषिकही महाविद्यालयास मिळवले. युवा महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते केला.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विविध कलाप्रकारांत विजेतेपद पटकावत डीकेएएससी कॉलेजची महागाव येथे झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली. तेथे विद्यार्थ्यांनी प्रभावी कलागुण सादर करत नाट्य व कलाविभागात विद्यापीठाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. वैयक्तिक स्पर्धेत मातीकाम प्रथम, रांगोळी प्रथम, स्थळचित्रण द्वितीय, कातरकाममध्ये उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली. सांघिक स्पर्धेत मूकनाट्य प्रथम, सांघिक रचनाकृती प्रथम, एकांकिका द्वितीय, पथनाट्यात तृतीय क्रमांक प्राप्त केला. एकांकिका स्पर्धेत सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनयाचे पारितोषिकही संपादित केले. सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने युवा महोत्सवामध्ये सहभाग घेतला.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार, ७ जानेवारी २०२२

# इचलकरंजीत २५६ छात्रांना प्रशिक्षण

## एनसीसीचे सप्ताहभर प्रशिक्षण : प्रशिक्षणार्थ्यांना मिळाले लष्करी अभ्यासक्रमाचे धडे

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये इचलकरंजी सेक्टर एनसीसीच्या छात्र सैनिकांना ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल डी. एस. सायना व कर्नल वैजंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित प्रशिक्षण शिबिर सात दिवस चालले. शिबिरासाठी डीकेएएससीचे ५६ छत्र सैनिक, गोविंदराव हायस्कूलचे १०० व डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूलचे १०० छात्र सैनिक शिबिरामध्ये सहभागी झाले होते. एकूण २५६ छात्र सैनिकांनी हे शिबिर पूर्ण केले.

शिबिरामध्ये एनसीसीच्या छात्रसैनिकांना सकाळी ९ ते ५ पर्यंत टाईम टेबलप्रमाणे प्रशिक्षण दिले. यामध्ये रोज ड्रील, वेपन ट्रेनिंग, मॅप रिडिंग, फाईल फॉर्मिशन, जजिंग डिस्टन्स अशा विविध आर्मी अभ्यासक्रमाचे धडे दिले.

यामध्ये पहिल्या दिवशी आर. डी. पिस्टे यांनी नेतृत्वाचे गुण, डीकेएएससीचे प्रा. विजय पाटील यांनी व्यक्तिमत्त्व विकास यावर, गोविंदराव हायस्कूलचे डॉ. अभिषेक कोल्हापुरे यांनी प्रथमोपचार, सौ. ललिता पुजारी (चंदूर) यांनी समाजसेवा यावर मार्गदर्शन केले. डिझास्टर मॅनेजमेंट आपत्कालीन व्यवस्थापन यावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिके सादर केली.


इचलकरंजी : एनसीसीच्या येथील शिबिरात प्रशिक्षण घेताना छात्रसैनिक.

ही सर्व माहिती इचलकरंजी पालिकेचे वाहन विभाग प्रमुख संजय कांबळे, अनिल पाटोळे, सूरज मुरगुंडे, रुपेश खरवार यांनी प्रात्यक्षिके करून दाखवली.

शिबिराची सांगता दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील सभागृहामध्ये झाला. प्रमुख पाहुणे म्हणून पालिकेचे कामगार अधिकारी विजय राजापुरे होते. त्यांनी एनसीसी छात्र सैनिकांचे शहरातील समाजसेवा किंवा इतर कामाविषयी कौतुक केले. एएससी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, गोविंदराव हायस्कूलचे मुख्याध्यापक एस. एस. चिंचवाडे, डॉ बापूजी साळुंखे हायस्कूलचे मुख्याध्यापक आय. ए. मुल्ला, ५६ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार चंदनसिंग, हवालदार गटेंद्र सिंग उपस्थित होते.

शिबिरासाठी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे सहकार्य लाभले. शिबिराचे नियोजन प्रा. मेजर मोहन विरकर, एनसीसी ऑफिसर सी. पी. कोरे, व्ही. एस. मुल्लाणी यांनी केले. शिबिरामध्ये ५६ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार चंदन सिंग व गटेंद्र सिंग यांनी आर्मीमधील सर्व विषयाचे मार्गदर्शन केले.

Scanned with CamScanner

दै. सकाळ

8/01/2022

# इचलकरंजीच्या विकासात एनसीसीचे योगदान

## विजय राजापुरे ; एनसीसी छात्र सैनिकांच्या प्रशिक्षण शिबिराची सांगता

इचलकरंजी, ता. ७ : एनसीसी छात्र सैनिकांचे इचलकरंजीच्या विकासात मोठे योगदान आहे. समाजसेवेसह इतर कामात छात्र प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. एनसीसी छात्रांचा आज्ञाधारक गुण सर्वच विद्यार्थ्यांसाठी आदर्श आहे, असे मत नगरपालिकेचे कामगार अधिकारी विजय राजापुरे यांनी व्यक्त केले.

डीकेएएससी महाविद्यालयात इचलकरंजी विभागातील एनसीसी छात्र सैनिकांच्या प्रशिक्षण शिबिराची सांगता झाली. यावेळी ते प्रमुख पाहुणे बोलत होते. ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल डी. एस. सायना व कर्नल वैज़ंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सात दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. दरम्यान, शिबिरामध्ये एनसीसीच्या छात्र सैनिकांना विविध प्रशिक्षण दिले. नियमित ड्रील, वेपन निंग, मॅप रिडिंग,फाईल फॉर्मेशन, जजिंग डिस्टन्स अशा विविध भारतीय सैन्यातील अभ्यासक्रमाचे धडे दिले. प्रमुख वक्त्यांचे विविध विषयांवर मार्गदर्शन झाले. प्रा. आर. डी. पिष्टे यांनी नेतृत्वाचे गुण, प्रा. विजय पाटील यांनी व्यक्तिमत्त्व विकास, डॉ. अभिषेक कोल्हपुरे यांनी प्रथमोपचार, सौ. ललिता पुजारी यांनी समाजसेवा या विषयावर मार्गदर्शन केले. पाचव्या दिवशी नगरपालिकेतर्फे आपत्कालीन व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दाखवली.



**इचलकरंजी : शिबिरात नगरपालिकेच्या वतीने आपत्कालीन व्यवस्थापनाची साहसी प्रात्यक्षिके घेतली.**

प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, गोविंदराव हायस्कूलचे मुख्याध्यापक एस. एस. चिंचवाडे, डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूलचे मुख्याध्यापक आय. ए. मुल्ला, ५६ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार चंदनसिंग, हवालदार गटेंद्रसिंग यांची प्रमुख उपस्थिती होती. डिकेएएससीचे ५६, गोविंदरावचे १०० आणि डॉ. बापूजी साळुंखेचे १०० छात्र सैनिक शिबिरामध्ये सामील होते. एकूण २५६ छात्र सैनिकांनी हे शिबिर पूर्ण केले आहे. शिबिराचे नियोजन प्रा. मेजर मोहन विरकर, सी. पी. कोरे, व्ही. एस. मुल्लानी यांनी केले. शिबिरात एनसीसी छात्र सैनिकांनी नानाविध कलागुण सादर केले. छात्र सैनिकांची शिकवलेल्या विषयावर सराव परीक्षा घेतली.

Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
११ जानेवारी २०२२



# 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागातर्फे बोन्सायवर ऑनलाईन कार्यशाळा झाली. अग्रणी महाविद्यालयअंतर्गत झालेल्या कार्यशाळेत प्रा. डॉ. धनश्री पाटील यांनी प्रात्यक्षिकासह सादरीकरण केले. बोन्साय कलेला संधी असून प्रशिक्षणातून ही कला रोजगाराची हमी देऊ शकते, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठ वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख प्रा. व्ही. डी. जाधव होते. प्रास्ताविक डॉ. एम. वाय. शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी दिला. आभार डॉ. एस. के. गावडे यांनी मानले. कार्यशाळेस विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार,
१२ जानेवारी २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात निर्भया पथकाच्या वतीने मुलींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले.

# 'डीकेएएससी'मध्ये मुलींना स्वरक्षणाचे धडे

इचलकरंजी : निर्भया पथकाच्या वतीने पोलिस विभागाकडून मुलींना स्वरक्षणाचे धडे दिले जात आहेत. डीकेएएससी महाविद्यालयात युगंधरा फौंडेशनच्या माध्यमातून मुलींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण दिले. पोलिस रायझिंग डेबाबत मार्गदर्शन केले. मुलींना महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण, अँटी रॅगिंग कमिटीकडे तक्रार देण्याचे आवाहन करण्यात आले. निर्भया पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक तेजश्री पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील शाळा, महाविद्यालयांत हा उपक्रम राबविला जाणार आहे.

Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
१३ जानेवारी २०२२

## डीकेएएससी कॉलेज

प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन झाले. यावेळी प्रा. डॉ. डी. जी. घोडके, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, मेजर प्रा. मोहन विरकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत

गुरूवार, १३ जानेवारी २०२२

# कराटे स्पर्धेमध्ये डीकेएएससी कॉलेजचे यश

**इचलकरंजी :** ऑल इंडिया ओपन शोतोकान कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा पुणे येथे पार पडल्या. स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयातील विद्यार्थीनी नंदीनी शिवराम शिंदे बी. कॉम भाग २ हिला काटा व ›››अणि फाईट" या प्रकारात २ गोल्ड मेडल, प्रतीक्षा हनुमंत टेकाळे (१२ वी आर्टस १ गोल्ड व १ सिल्वर), अश्विनी अरूण साबळे (बी. एस्सी. २, १ गोल्ड व १ सिल्वर) मेडल मिळाले. त्यांना सौ. किरण रविकिरण चौगुले (ब्लॅक बेल्ट) यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे व प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुज्जफर लगिवाले, जयकुमार करके यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
१४ जानेवारी २०२२



इचलकरंजी : कराटे स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करताना इन्चार्ज प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव.

## कराटेत 'डीकेएएससी'चे यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने कराटे स्पर्धेत यश मिळवले. पुणे येथे झालेल्या ऑल इंडिया ओपन शोतोकान कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत तीन विद्यार्थिनींनी यश प्राप्त केले. नंदिनी शिंदेने काटा व फाईट प्रकारात दोन सुवर्णपदक, प्रतीक्षा टेकाळे, अश्विनी साबळे यांनी सुवर्ण व कास्यपदक मिळवले. इन्चार्ज प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. त्यांना क्रीडा विभागप्रमुख मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफर लगिवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
२० जानेवारी २०२२

# 'डीकेएएससी'मध्ये पुस्तक प्रदर्शन

इचलकरंजी : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा जन्म दिवस डीकेएएससी महाविद्यालयात ज्ञान शिदोरी दिन म्हणून साजरा केला. तसेच यासह विवेकानंद जयंती सप्ताह, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त कार्यक्रम झाले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमांचे पूजन केले. वाचन संस्कृती, मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे महत्व प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी सांगितले. ज्ञान शिदोरी दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शन भरवले. आभार प्रा. डी. ए. यादव यांनी मानले. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. व्ही. बी. शिंदे, प्रा. मेजर मोहन वीरकर, डॉ. एस. टी. इंगळे, डॉ. पी. के. वाघमारे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

# डीकेएएससी कॉलेजमध्ये 'ज्ञानशिदोरी दिन' साजरा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आणि 'ज्ञानशिदोरी दिन' असा संयुक्त कार्यक्रम ग्रंथालयाच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. स्वामी विवेकानंद, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक ग्रंथपाल विजय यादव यांनी केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे महत्त्व आणि वाचन संस्कृतीची गरज याविषयी डॉ. एकनाथ आळवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस 'ज्ञानशिदोरी दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. आभार प्रा. डी. ए. यादव यांनी मानले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. व्ही. बी. शिंदे, डॉ. इंगळे, डॉ. वेल्हाळ, डॉ. जाधव, डॉ. वाघमारे, डॉ. घारे, सहाय्यक ग्रंथपाल चव्हाण ; तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते.

केसरी

9921600800

20-1-2022

सकाळ TODAY

सोमवार,
२४ जानेवारी २०२२ ३

# पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न करावेत : डॉ. आतीष पाटील

इचलकरंजी, ता. २३ : नैसर्गिक घटकांच्या प्रदूषणामुळे पर्यावरणात विपरित बदल होत आहेत. माणसाच्या हव्यासामुळे होणारी पर्यावरणाची हानी अशीच सुरू राहिली तर २०५० पर्यंत पृथ्वीवरील मानवाचे जगणे मुश्किल होईल. त्यामुळे मानवाने आताच सावध होऊन पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे मत प्रा. डॉ. आतीष पाटील यांनी व्यक्त केले. रुकडी येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात रोटरी क्लब, डांगे महाविद्यालय, कन्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भूगोल दिनानिमित्त ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन केले होते.

या वेळी मानवी हस्तक्षेपामुळे होणारे पर्यावरणीय बदल या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत कांबळे होते. डॉ. अशोक पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सोनम कांबळे हिने सूत्रसंचालन केले. यतिराज भंडारी, नागेश दिवटे आदींनी मनोगते व्यक्त केले. रोहित राजमाने यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner


# प्रजासत्ताक दिन

२६ जाने. २०२२.

● डीकेएएससी महाविद्यालय

प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते ध्वजवंदन झाले. राष्ट्रीय छात्र सेनेच्यावतीने संचलन करत राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, मेजर मोहन वीरकर, एकनाथ आळवेकर, प्रा. अरूण कटकोळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner



बुधवार दि. २६ जानेवारी २०२२ ७

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार''
- शिक्षण महर्षि डॉ.बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

दत्ताजीराव कदम आर्टस्,
सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

फोन (०२३०) २४२०४१२ फॅक्स (०२३०) २४२४५५५
(शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर निरंतर संलग्नित - ॲफि/टी-२/५०४९, दि.१०/७/१९९९)
ज्यु.कॉ.सांकेतीक क्र.जे २३.०६.००१ नॅक मानांकन - 'अ' (३.०२)
Email : dkasccollege@gmial.com ● ich38.cl@unishivaji.ac.in
Website : www.dkasc.ac.in

कार्याध्यक्ष
प्राचार्य अभयकुमार साळुंखे
एम.ए.

सेक्रेटरी
प्राचार्या सौ. शुभांगी गावडे
एम.एस्सी, बी.एड.

प्राचार्य
प्राचार्य श्री. विठ्ठल शं. ढेकळे
एम.कॉम.,एम.फील,
पीएचडी,एमबीए

साप्ताहिक इचलकरंजी समाचार
56
1966 - 2022
कुणाचीही भीडभाड न ठेवता निर्भिड चर्चेचे सर्वाधिक खपाचे एकमेव साप्ताहिक
संस्थापक, संपादकः कै. एस. बी. वडेकर, कै. राजाराम एस. वडेकर संपादकः अरूण आर. वडेकर

Scanned with CamScanner

सकाळ » TODAY

सोमवार,
३१ जानेवारी २०२२

# कोल्हापूर जिल्हा

## अवतीभवती

### 'डीकेएएससी'मध्ये माजी विद्यार्थी मेळावा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा झाला. स्वागत व प्रास्ताविक डॉ. डी. जी. घोडके यांनी केले. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष राजन मुठाणे यांनी मेळाव्याची भूमिका विषद केली. माजी विद्यार्थी विजय शर्मा यांनी महाविद्यालय काळातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. निवृत्त प्रा. एम. एम. कांबळे, वनस्पतीशास्त्र विभाग डॉ. एस. टी. इंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. एस. ढेकळे होते. प्रा. विजय पाटील यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

साप्ताहिक अमॅच्युअर

03/02/2022

# प्रा. नागराळे सर यांचे कार्य प्रशंसनीय



सेवापूर्तीनिमित्त प्रा. नागराळे सरांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. बी. टी. मोरे, विश्वंभर कुलकर्णी, प्रा. मिलींद भंडारी, प्रा. एन. एम. सावंत

इचलकरंजी – येथील डीकेएएससी महाविद्यालयात प्रा. नागराळे यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. कर्तव्यनिष्ठ, अभ्यासू, चिंतनशील नागराळे सरांचा आदर्श नवोदित गुरुदेवांनी घेऊन विद्यार्थी घडवावेत, असे मत प्राचार्य डॉ. डी. एस. ढेकळे यांनी अध्यक्षस्थानावरुन बोलताना व्यक्त केले.

प्रा. बी. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. टी. मोरे, विश्वंभर कुलकर्णी, प्रा. मिलींद भंडारी, प्रा. एन. एम. सावंत यांनी नागराळे सरांच्या विविध पैलूंना उजाळा दिला.

मनोगतात प्रा. नागराळे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी सर्व कॉलेजचा प्राध्यापक वृंद उपस्थित होता.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
४ फेब्रुवारी २०२२



इचलकरंजी : प्रा. आय. एम. नागराळे यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

## प्रा. नागराळेंचा सत्कार

इचलकरंजी : डीकेएएससी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. आय. एम. नागराळे यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक प्रा. एम. बी. पाटील यांनी केले. प्रा. टी. बी. मोरे, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. मिलिंद भंडारे, प्रा. एन. एम. सावंत आदींनी नागराळे यांच्या आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत


शनिवार, ५ फेब्रुवारी २०२२

# नक्षत्रवन साकारण्यासाठी एनसीसी कॅडेटस्‌चे श्रमदान

प्रतिनिधी
इचलकरंजी

इचलकरंजी नगरपालिकेच्यावतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत ऑक्सीजन पार्कमध्ये नक्षत्रवन साकारत आहे. याठिकाणी शुक्रवारी डीकेएएससी कॉलेजच्या एनसीसीच्या मुलांनी श्रमदान केले. यावेळी या मुलांना नक्षत्रवन तसेच जीवामृत कसे तयार करावे व त्याचा झाडांना काय उपयोग होतो, याबाबतची माहिती देण्यात आली.

शहरात पालिकेचे अनेक उद्याने आहेत. नक्षत्रवनमधील २७ प्रकारच्या झाडामधील विविध झाडे ठिकठिकाणी आहेत. मात्र एकाच ठिकाणी नक्षत्रवन व त्याची शास्त्रीय पद्धतीने वृक्षारोपण आजअखेर कोणत्याच उद्यानात झाली नाही. त्यामुळे शास्त्रोक्त पद्धतीने नक्षत्रवन प्रकल्प माझी वसुंधरा अभियानांतर्गत उभारण्यात येत आहे.



इचलकरंजी : नियोजित नक्षत्रवनात डीकेएएससी कॉलेजच्या एनसीसी कॅडेटसनी श्रमदान केले. यावेळी नक्षत्रवनची माहिती देताना सौ. चित्कला कुलकर्णी, सुनील बावडेकर.

येथील पालिकेच्या थोरात चौकलगत असलेल्या ऑक्सिजन पार्कमध्ये मध्यवर्ती ठिकाणी नक्षत्रवनसाठी आवश्यक असणारी साडेपाचशे चौरस मीटर जागा उपलब्ध आहे. पालिकेच्यावतीने या ठिकाणी रेखांकन करून झाडासाठी खड्डेही खोदण्यात आले आहेत.

या झाडांसाठी नैसर्गिक खत म्हणून जीवामृत तयार करण्यात येत आहे. याचे प्रात्यक्षिक ग्रीन इचलकरंजीचे सदस्य सुनील बावडेकर यांनी दाखवले. त्यानंतर नक्षत्र वन म्हणजे काय आणि ऑक्सीजन पार्कमध्ये साकारत असलेले नक्षत्र वन कसे आहे याची माहिती चित्कला कुलकर्णी यांनी दिली. प्रास्ताविक संजय खुळ यांनी केले. त्यानंतर या मुलांनी नक्षत्रवन साकारत असलेल्या ठिकाणी श्रमदान केले. उपमुख्याधिकारी केतन गुजर, कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, एनसीसी विभाग प्रमुख मेजर मोहन विरकर, उद्यान निरीक्षक संपत चव्हाण यांच्यासह पालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

शनिवार, १२ फेब्रुवारी २०२२

तरुण भारत

कोल्हापूर दिनांक पान ३

# इचलकरंजीत आढळले ५६० हेरिटेज वृक्ष

## गावभाग परिसरात सर्वाधिक झाडे : हेरिटेज वृक्ष आता तोडता येणार नाहीत

संजय खूळ
इचलकरंजी

शहरात पन्नास वर्षापेक्षा अधिक जुने असलेले ५६० हेरिटेज वृक्ष आढळून आले आहेत. इचलकरंजी नगरपालिका आणि डीकेएएससी कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाने संयुक्तरित्या राबविलेल्या मोहिमेत ही झाडे आढळून आली. विशेष म्हणजे यातील सर्वाधिक वृक्ष हे गाव भागात आढळून आले आहेत.

शासनाने जुन्या वृक्षांची जोपासना करण्यासाठी ५० वर्षापेक्षा अधिक वयोमान असणाऱ्या झाडांची गणना सुरू केली आहे. इचलकरंजी नगरपालिकेच्यावतीने २६ प्रभागातील सर्व झाडांची गणना करण्याचा निर्णय झाला. यासाठी येथील डीकेएससी कॉलेजच्या मदतीने ही वृक्षगणना पूर्ण करण्याचा निर्णय पालिकेने घेतला.



इचलकरंजी : पुरातन वृक्षांची गणना करतेवेळी मुख्याधिकारी डॉ. प्रदीप ठेंगल, प्राचार्य डॉ. विठ्ठल ढेकळे, उपमुख्याधिकारी केतन गुजर, माजी नगरसेवक विठ्ठल चोपडे, वनस्पती विभाग प्रमुख डॉ. सुभाष इंगळे, डॉ. एस. के. गावडे आदी.

पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. प्रदीप ठेंगल, प्राचार्य डॉ. विठ्ठल ढेकळे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षगणनेस प्रारंभ झाला.

जमिनीपासून साडेचार फुटाच्या अंतरावर वृक्षाचा घेर यासाठी मोजमाप करण्याचे ठरले आणि त्यानुसार जुन्या वृक्षांची यादी तयार करण्यात आली. सुमारे पंधरा दिवस ही मोहीम सुरू होती. यामध्ये २६ प्रभागातील हजारो वृक्षांची पाहणी करण्यात आली. इचलकरंजी शहरात यापूर्वी झालेल्या पर्यावरण विषयक अभ्यासात ५० व शंभर वर्षापेक्षा जुनी असणारी अनेक झाडे आढळून आली होती. या मोहिमेत तब्बल ५६० हेरिटेज वृक्ष आढळून आले. विशेषतः गावभाग परिसरात असे वृक्ष मोठ्या प्रमाणात आजही कायम आहेत व त्यांची जोपासना ही चांगल्या पद्धतीने झाली आहे. शहरातील काही भागात जुने असणारी झाडे पडली आहेत तर काही ठिकाणी बांधकामामुळे या झाडांचा आधार तुटला आहे. परंतु गावभागात अशी झाडे अत्यंत सुरक्षित असल्याचे आढळून आले. अनेक वृक्षांचे वयोमान शंभर वर्षापेक्षा अधिक आहे.

पालिकेच्यावतीने आता आढळून आलेले सर्व वृक्ष हेरिटेज वृक्ष म्हणून घोषित करण्यात येणार आहेत. यापुढील काळात ही झाडे आता कोणालाही तोडता येणार नाहीत. जर अत्यावश्यक कारणासाठी ही झाडे काढावी लागली तर ती तोडण्यासाठी आता थेट शासनाकडूनच परवानगी घ्यावी लागणार आहे.

डीकेएएससी कॉलेजचे वनस्पती विभाग प्रमुख डॉ. सुभाष इंगळे, डॉ. एस. के. गावडे यांच्यासह एम. एस्सी. भाग दोन मध्ये शिक्षण घेणारे अवधूत चव्हाण, कौस्तुभ लवटे, श्वेता जोखे, ऋतुजा गोंदकर, शुभांगी कुराडे व सुधा नलवडे हे विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. पालिकेचे उद्यान विभाग प्रमुख संपत चव्हाण व या खात्यातील कर्मचाऱ्यांचे या मोहिमेसाठी सहकार्य लाभले.

### सर्वांत जुने वड पिंपळ

शहरात आढळून आलेल्या हेरिटेज वृक्षामध्ये सर्वाधिक जुनी झाडे वड आणि पिंपळ आहेत. ही झाडे गावभाग परिसरातच अधिक प्रमाणात आहेत. याच बरोबर चिंच आणि आंबा यांची झाडेही हेरिटेजमध्ये आढळून आली. या गणनेत शहरामध्ये जैतून झाडही आढळून आले आहे

Scanned with CamScanner

# म्हातारा पाऊस एकांकिका प्रथम

## इचलकरंजीत प्राथमिक फेरी; रुद्राक्ष ॲकॅडमीची मनस्विनीला दुसरा क्रमांक

इचलकरंजी, ता.१३ : मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय एकांकिका महोत्सवासाठी झालेल्या प्राथमिक फेरीत येथील 'डीकेएएससी' महाविद्यालयाची म्हातारा पाऊस ही एकांकिका प्रथम आली.

या संघाची एकांकिका महोत्सवात अंतिम फेरीसाठी निवड झाली. रुद्राक्ष ॲकॅडमी कोल्हापूर संघाच्या मनस्विनी एकांकिकेला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. प्रतिरंग प्रोडक्शनने येथील दाते मळा रोटरी क्लबच्या सभागृहात या प्राथमिक फेरीचे आयोजन केले होते. या फेरीत स्त्री आणि पुरुष अभियानाची एकूण पाच पारितोषिके दिली. कोल्हापूर, सांगली, जयसिंगपूर, इचलकरंजी, मिरज आदी भागांतून एकूण १२ संघ सहभागी झाले होते.

मनपा कलावंत संघटना मुंबईतर्फे श्रीमती कमल वसंत जाधव करंडक खुल्या राज्यस्तरीय एकांकिका महोत्सवाचे आयोजन केले आहे.



इचलकरंजी : राज्यस्तरीय एकांकिका महोत्सवाच्या अंतिम फेरीत 'डीकेएएससी' महाविद्यालयाच्या म्हातारा पाऊस या एकांकिकेची निवड झाली.

### अभिनय पारितोषिके अशी

पुरुष अभिनयासाठी दोन तर स्त्री अभिनयासाठी तीन पारितोषिक प्राथमिक फेरीत दिली. स.न.वि. वि. या एकांकिकेत बाबा व्यक्तिरेखेसाठी दिनेश मनवानी, तर बेड टाईममधील चैतन्य व्यक्ती रेखेसाठी प्रतीक साठे यांना पारितोषिक मिळाले. 'मनस्विनी'मधील स्वरदा फडणीस, 'मूव्ह ऑन मीरा'मधील शुभांगी चव्हाण, 'अंकूर'मधील ऐश्वर्या खोत यांना स्त्री अभिनयाची पारितोषिक प्राप्त झाली.

या स्पर्धेत राज्यातून मोठ्या संख्येने संघ सहभागी होत असतात. त्यासाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही प्राथमिक फेरी आचरेकर प्रतिष्ठान नाट्यगृह, कणकवली येथे होणार होती. स्पर्धेत सातारा वगळता पश्चिम महाराष्ट्रातील होणाऱ्या संघांची संख्या जास्त आहे. सर्व संघाची गैरसोय दूर करत आयोजकांशी संपर्क साधला. शहरातील प्रतिरंग प्रोडक्शनने पुढाकार घेत प्राथमिक फेरी इचलकरंजी शहरातच घेतली.

### अंतिम स्पर्धा रविवारी मुंबईत

अंतिम स्पर्धा रविवारी (ता.२०) महाकवी कालिदास नाट्यगृह, मुलुंड मुंबई येथे होणार आहे. राजदत्त तांबे आणि रमेश कांबळे यांनी परीक्षणाचे काम पाहिले. प्रतीक साठे, सारंग भांबुरे, पंडित ढवळे, अनिल सोनटक्के, तुषार कुडाळकर आदींनी परिश्रम घेतले.



# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने यश मिळविले. भूगोलशास्त्र विभागातील विद्यार्थी किरण यादव याच्या फ्लोटिंग वॉटर फिल्टर या प्रकल्पास द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. प्रा. डॉ. आतीष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने हा प्रकल्प तयार केला होता. त्याची पुढील विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, डॉ. डी. ए. कुंभार, भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

मंगळवार,
१५ फेब्रुवारी २०२२ २

# डीकेएएससीच्या विवेक अंकाचे प्रकाशन

इचलकरंजी, ता.१४ : जगाला विवेकवादी प्रेमाची गरज आहे. त्यासाठी आता व्यक्तिमत्त्व विकासाच्या चळवळीची गरज आहे, असे मत प्रसाद कुलकर्णी यांनी काढले. डीकेएएससी महाविद्यालयाच्या विवेक या वार्षिक अंकाच्या प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

श्री. कुलकर्णी म्हणाले, ''लेखक घडवण्यात महाविद्यालयाच्या विवेकचा वाटा असून इचलकरंजी परिसरातील लेखक, कवी, पत्रकार घडवण्यातही विवेकचे योगदान मोलाचे आहे. माणसांचे माणसापासून तुटलेपण हे आजच्या काळातील आव्हान आहे. झुंडशाहीला विरोध करायचा असेल तर मानवी प्रेमभावना जागृत व्हायला हवी.''

विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला वाव देण्याचे काम महाविद्यालयाचा वार्षिक अंक करीत असतो. विद्यार्थ्यांनी सातत्याने लेखन करणे आवश्यक आहे, असे मत प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी मांडले. प्रास्ताविक व स्वागत विवेक वार्षिक अंकाचे संपादक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. परिचय डॉ. सौ. एस. जे. वेल्हाळ यांनी करून दिला. आभार डॉ. एन. एच. शेख यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ
गुरुवार,
१७ फेब्रुवारी २०२२



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या आविष्कार स्पर्धेत तृतीय आलेल्या किरण यादव याचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. डॉ. डी. सी. कांबळे आदी.

## किरण यादव तृतीय

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय आविष्कार स्पर्धेत डिकेएएससी महाविद्यालय चमकले. भूगोलशास्त्र विभागातील किरण यादव याने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. त्याची आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या आविष्कार संघात निवड झाली आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत त्याने द्वितीय क्रमांक मिळवला होता. आंतरविभागीय स्पर्धेतही त्याच्या उपकरणास तृतीय क्रमांक मिळाला. डॉ. अतिश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने फ्लोटिंग वॉटर फिल्टर हा प्रकल्प तयार केला. त्याच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांच्याहस्ते त्याचा सत्कार केला. संशोधन समितीचे प्रमुख डॉ. डी. ए. कुंभार, प्रा. अरुण कटकोळे, प्रा. अक्षय स्वामी, प्रा. डॉ. गाणबावले उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, १७ फेब्रुवारी २०२२

# कोल्हापूर जिल्ह्याचे वर्चस्व कायम

## रोईंग, कनोईंग, कयाकिंग स्पर्धा; विद्यापीठाची आंतरविभागीय निवड चाचणी



इचलकरंजी : पंचगंगा नदीपात्रात शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय रोईंग, कनोईंग व कयाकिंग स्पर्धा झाल्या.

इचलकरंजी, ता.१६ : शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय रोईंग, कनोईंग व कयाकिंग निवड चाचणी स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्याने वर्चस्व कायम ठेवले. महिला विभागात डी. आर. माने व कोल्हापूरचे डी. वाय. पाटील कॉलेज सरस ठरले. पुरूष विभागात व्यंकटेश व डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी केली.

पंचगंगा नदी घाटावर नाईट कॉलेज व वरदविनायक बोट क्लबतर्फे स्पर्धेचे आयोजन केले. यातून विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाची निवड केली. हे खेळाडू चंदीगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणार आहेत. दादासो साबळे, बापू सलगर व वर्षा शिंदे यांच्या निवड समितीने काम पाहिले. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील खेळाडू सहभागी झाले होते.

निकाल अनुक्रमे असा : रोईंग-५०० मीटर पुरुष : श्रीकांत नरसंबे (पतंगराव कदम महाविद्यालय), गणेश माळी (जी. ए.आरवाडे कॉलेज), ओंकार पाटील (वालचंद कॉलेज). कयाकिंग-१००० मीटर (केवन) महिला-अमृता पाटील (डी. वाय. पाटील, कॉलेज), निकिता पिष्टे (डी. आर. माने, कॉलेज), श्रावणी हळीज्वाळे (विवेकानंद). ५०० मीटर (केवन) महिला-निकिता पिष्टे (डी. आर. माने), शालिनी पिसे (डी. वाय. पाटील),राजनंदिनी पाटील (के. आय. टी.). २०० मीटर (केवन) महिला-निकिता पिष्टे (डी. आर. माने), गायत्री पाटील (डी. वाय. पाटील),श्रावणी हळीज्वाळे (विवेकानंद). कयाकिंग पुरुष-१००० मीटर (केवन)-श्रेयांक्ष पाटील (व्यंकटेश कॉलेज), करण घुणके (डीकेएएससी कॉलेज), ओंकार पाटील (के. डब्लू. सी.). ५०० मीटर (केवन) : श्रेयांश पाटील (व्यंकटेश कॉलेज), कौस्तुभ पोकार्डे (डिकेएएससी), सोहम मगदूम (नाईट कॉलेज, इचलकरंजी), २०० मीटर (केवन) : पवन कोळी (डिकेएएससी), श्रेयांश पाटील (व्यंकटेश कॉलेज), नीरज नर्लेकर (नाईट कॉलेज, इचलकरंजी).

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
२८ फेब्रुवारी २०२२



इचलकरंजी : तायक्वांदो स्पर्धेत द्वितीय आलेली अनुराधा शेलार. शेजारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे आदी.

## अनुराधा शेलारची निवड

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाची खेळाडू अनुराधा शेलार हिने शिवाजी विद्यापीठ विभागीय तायक्वांदो स्पर्धेत यश मिळविले. ४६ ते ४९ वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करीत तिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तिची सातारा येथे होणाऱ्या आंतरविभागीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते तिचा सत्कार केला. तिला प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार, १ मार्च २०२२

## डीकेएएससी महाविद्यालय

पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाच्यावतीने प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. भित्तीपत्रिकेचे उद्घाटन केले. प्रा. डॉ. शिंदे यांनी मराठी भाषेचे महत्व सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. सी. ढेकळे होते. प्रास्ताविक व स्वागत प्रा. सौ. एम. एम. माने यांनी केले. आभार प्रा. वीणा पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. रोहिणी रेळेकर, प्रा. एन. एम. सावंत आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
२ मार्च २०२२

# डीकेएएससीत विज्ञान दिन

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विभागामार्फत राष्ट्रीय विज्ञान दिन झाला. कास पठारावरील जैवविविधता व पठारावर फुलणाऱ्या दुर्मीळ फुलांना टिकवायचे असेल, तर कास पठाराचे संवर्धन होणे गरजेचे आहे. त्याचे सखोल शास्त्रीय संशोधन आणि डोळस संरक्षण व्हायला हवे, असे मत प्रा. शेखर ए. मोहिते यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. स्वागत व प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी केले. आभार प्रा. डॉ. मधुमती शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. आम्रपाली कट्टी यांनी केले. डॉ. संदीप गावडे, प्रा. सौ. भारती दोपारे, प्रा. सौ. उर्मिला चौगुले आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

# डी. के. ए. एस.सी. महाविद्यालयाचे तायक्वाँदो स्पर्धेत यश

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या महाविद्यालयाची खेळाडू अनुराधा शेलार (बी. कॉम. तृतीय) हिने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर विभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ४६ ते ४९ या वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला व सातारा येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली.

अनुराधाचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. तिला प्रा. मेजर वीरकर, प्रा. मुझफ्फर लागीवाले व जयकुमार कारके यांचे मार्गदर्शन लाभले.



2-3-2022

केसरी

9921600800




इचलकरंजी : येथील डी. के. ए. एस. सी. कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त बोलताना प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे.

# डीकेएएससी महाविद्यालयात मराठी भाषा दिनी व्याख्यान

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : येथील डी. के. ए. एस. सी. कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाच्यावतीने प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी भित्तिपत्रिकेचे अनावरणही करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगितले. प्रास्ताविक प्रा. एम. एम. माने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी करून दिला. आभार प्रा. वीणा पाटील यांनी मानले.

सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. याप्रसंगी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. रोहिणी रेळेकर, प्रा. एन. एम. सावंत, डॉ. वेल्हाळ, डॉ. बेंद्रे, डॉ. गाणबावले, प्रा. शिंदे, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

केसरी

9921600800

3-3 2022

सकाळ

बुधवार,
९ मार्च २०२२

## डीकेएएससी महाविद्यालय

ॲड.सौ. तेजश्री बाडकर यांचे 'महिलांचे हक्क आणि अधिकार : कायद्यामधील तरतुदी' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. ॲड. बाडकर यांनी महिलांविषयी कायद्याची माहिती सांगितली. डी. सी. कांबळे, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. मेजर मोहन वीरकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शनिवार,
१२ मार्च २०२२



इचलकरंजी : विद्यापीठ संघात निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंची निवड

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड झाली. पाच खेळाडूंची चंदिगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कयाकिंग व कनोइंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. त्यांनी आंतरविभागीय स्पर्धेत यश मिळवले. करण घुणके, पवन कोळी, कौस्तुभ पोकार्डे, साहिल केसरकर, ओंकार दिवटनकर हे खेळाडू कयाकिंग प्रकारातून विद्यापीठ संघाचे नेतृत्व करतील. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते सत्कार केला. गणेश बरगाले, प्रा. मेजर विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner



**आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झालेले डीकेएएससी महाविद्यालयाचे खेळाडू.**

# डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

**कोल्हापूर** : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए.एस. सी. महाविद्यालयाच्या खेळाडूंची चंदीगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. नाईट कॉलेज, इचलकरंजी यांच्या विद्यमाने आंतरविभागीय स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला होता. डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयाचे खेळाडू करण घुणके k2a k4, पवन कोनी k1 d k2 तर कौस्तुभ पोकार्डे k4 या कयाकिंग प्रकारातून विद्यापीठ संघाचे नेतृत्व करतील. तसेच साहील केसरकर c2 व c4 व ओंकार दिवटनकर C1,C2,C4 या कनोईंग प्रकारातून विद्यापीठ संघाचे नेतृत्व करतील. या सर्व खेळाडूचा प्राचार्य डॉ. व्ही. एस ढेकळे यांच्या हस्ते सत्कार केला. खेळाडूंना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुझफ्फर लागीवाले, जयकुमार कारके आदींचे मार्गदर्शन लाभले.

केसरी

9921600800

12-3 2022

लोकमत
कोल्हापूर, सोमवार, दि. १४ मार्च २०२२

चौक भरून गेला होता.

# दत्ताजीराव कदम कॉलेजला विजेतेपद

## पुरुषोत्तम करंडक : भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाला उपविजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेजने पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या सांघिक विजेतेपदावर रविवारी नाव कोरले. या महाविद्यालयाने 'म्हातारा पाऊस' ही एकांकिका सादर केली. 'अंदाजपंचे' एकांकिका सादर करणाऱ्या भारती विद्यापीठाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने उपविजेतेपद पटकावले. शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या 'श्री श्री १०८ दगड' या एकांकिकेने तृतीय क्रमांक मिळवला.

पुणे येथील महाराष्ट्रीय कलोपासक, शिवाजी विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग व गायन समाज देवल क्लब यांच्यातर्फे दि. ११ ते १३ मार्च दरम्यान विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनात ही स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये १४ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचा निकाल रविवारी जाहीर झाला. त्यातील विजेत्या संघांना अभिनेते सतीश सलागरे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनंत निघोजकर, योगेश जाधव, आशिष शेट्टी, संदीप जोशी, उमा नामजोशी, सचिन पुरोहित, सुबोध गद्रे, डॉ. अंजली निगवेकर, विनोद



कोल्हापुरात रविवारी इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेजने पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या सांघिक विजेतेपदावर नाव कोरले. या संघाला अभिनेते सतीश सलागरे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनंत निघोजकर, योगेश जादाव, आशिष शेट्टी, संदीप जोशी, सचिन पुरोहित, उमा नामजोशी, सुबोध गद्रे, अंजली निगवेकर, विनोद ठाकूरदेसाई, आदी उपस्थित होते.

### पार्थ घोरपडे, सृष्टी सलागरे ठरली उत्कृष्ट


सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची 'बारा किलोमीटर' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाचा पार्थ घोरपडे (उत्कृष्ट अभिनेता), डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमधील सृष्टी सलागरे (उत्कृष्ट अभिनेत्री), डीआरके कॉलेजचा संग्राम देसाई (सर्वोत्कृष्ट लेखक), दत्ताजीराव कदम कॉलेजचा सुधाकर ठोकळे (सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक), समीक्षा संकपाळ (सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय) यांना गौरविण्यात आले.

ठाकूरदेसाई, अनुपम दामाडे उपस्थित होते. उज्ज्वल खांडेकर, राजश्री खटावकर, श्रीधर विसाळ यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत

बुधवार, १६ मार्च २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळेत प्रात्यक्षिक दाखविताना संजय कांबळे व सहकारी.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये आपत्कालीन व्यवस्थापनावर कार्यशाळा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्यावतीने अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत आपत्कालीन व्यवस्थापनवर कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेत संजय कांबळे यांनी मार्गदर्शक करीत प्रात्यक्षिकाचे सादरीकरण केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. आपत्तीकालन व्यवस्थापनाचे शिक्षण काळाची गरज आहे. आपत्तीपूर्व आणि आपत्ती काळात घेतली जाणारी काळजी व व्यवस्थापन कसे करावे, यांचे मार्गदर्शन कांबळे यांनी केले. रूपेश खरवार, संजय झुटाळ यांनीही प्रात्यक्षिकाचे सादरीकरण केले. पाहुण्यांचा परिचय एनसीसी विभागप्रमुख व समन्वयक मेजर मोहन वीरकर यांनी करुन दिला. प्रास्ताविक डॉ. पी. के. वाघमारे यांनी केले. आभार डॉ. मधुमती शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन सुप्रिया उळे हिने केले कार्यक्रमासाठी इचलकरंजी नगरपालिकचे तुषार हेगडे, सुकुमार उंदूरे, अनिल पवार व दशरथ जाधव यांनी प्रात्यक्षिक सादरीकरणात सहभाग नोंदविला. कार्यशाळेत क्लस्टर कॉलेज अंतर्गत विविध महाविद्यालयातील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. प्रा. मुजफ्फर लगिवाले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. यादव, डॉ. इंगळे, डॉ. गावडे, डॉ. वेल्हाळ आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, १७ मार्च २०२२

# डीकेएएससी महाविद्यालय प्रथम

## पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा ; महेश गवंडी सर्वोत्कृष्ट अभिनय

इचलकरंजी, ता. १६ : येथील दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेजने पुरुषोत्तम करंडक जिंकून एकांकिका स्पर्धेमध्ये निर्विवाद वर्चस्व मिळविले. स्पर्धेत महाविद्यालयाने म्हातारा पाऊस ही एकांकिका सादर केली होती. सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक महेश गवंडी, वाचक अभिनयाचे पारितोषिक समीक्षा संकपाळ, एकांकिका दिग्दर्शन प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सुधाकर ढोकळे यांना मिळाले. तर एकांकिकेला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. कार्याध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगीताई गावडे यांच्याहस्ते महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचा सत्कार केला.



इचलकरंजी : पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल डीकेएएससी महाविद्यालयाच्या सत्कारप्रसंगी डॉ. अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे आदी.

महाराष्ट्र कलोपासक पुणे, गायन समाज देवल क्लब आणि संगीत व नाट्य विभाग शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा झाली. स्पर्धेत डिकेएएससी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत प्रथम येण्याचा बहुमान पहिल्यांदाच महाविद्यालयाला मिळाला आहे. यापूर्वी महाविद्यालयाने जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी करत छाप उमटवली होती. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या सहभागी होण्याआधी ही एकांकिका शहरातील घोरपडे नाट्यगृहात सादर केली होती. शहरातील रसिकांचा यास प्रतिसाद मिळाला. त्यानंतर करंडक स्पर्धेत एकांकिकेने प्रथम क्रमांक प्राप्त केला. एकांकिकेमधील सहभागी कलाकार विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. पी. के. वाघमारे, प्रा. डॉ. वेल्हाळ, प्रा. डॉ. रॉड्रिक्स, प्रा. मेजर मोहन वीरकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
१७ मार्च २०२२

# आपत्ती व्यवस्थापनावर इचलकरंजीत कार्यशाळा

इचलकरंजी, ता. १६ : येथील डीकेएएससी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा झाली. एनएनसी विभागातर्फे अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत या कार्यशाळेचे आयोजन केले. आपत्तकालीन व्यवस्थापनाचे शिक्षण काळाची गरज आहे. आपत्तीपूर्व आणि आपत्ती काळात घेतले जाणारे प्रशिक्षण प्रत्येकाने घेतले पाहिजे, असे मत इचलकरंजी नगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापनप्रमुख संजय कांबळे यांनी केले. त्यांनी एनसीसी छात्रांना मार्गदर्शन करत साहसी प्रात्यक्षिकाचे सादरीकरण केले.

रूपेश खरवार, संजय झुटाळ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी आग विझवणे, पूरपरिस्थिती, इमारतीवरून उतरविणे, प्रथमोपचार यासह विविध प्रात्यक्षिकाच्या सादरीकरणातून धडे दिले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. पाहुण्यांचा परिचय एनएनसी विभागप्रमुख समन्वयक मेजर मोहन वीरकर यांनी करून दिला. प्रास्ताविक डॉ. पी. के. वाघमारे यांनी केले. आभार डॉ. मधुमती शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन सुप्रिया उळे हिने केले. तुषार हेगडे, सुकुमार उंदुरे, अनिल पवार, दशरथ जाधव आदींनी प्रात्यक्षिक सादरीकरणात सहभाग नोंदवला. कार्यशाळेत विविध महाविद्यालयांतील ७० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

CS Scanned with CamScanner

साप्ताहिक अमॅच्युअर
दि. १७ मार्च २०२२ ते २३ मार्च २०२२

# पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत **डीकेएएससी** प्रथम



इचलकरंजी – पुण्याचे महाराष्ट्रीय कलोपासक, कोल्हापूरचे गायन देवल क्लब आणि शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या 'म्हातारा पाऊस' ने प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी यशस्वी विद्यार्थी तसेच दिग्दर्शक अनिरुद्ध दांडेकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांचे अभिनंदन केले.

Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, शनिवार,
१९ मार्च २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेत बोलताना डॉ. प्रभावती पाटील.

# ‘डीकेएएसी’मध्ये कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालया अंतर्गत ‘इंग्लिश फॉर करिअर ऑपॉर्च्युनिटीज’ या विषयावर इंग्रजी विभागामार्फत कार्यशाळा आयोजित केली. कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुणे व तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रभावती पाटील उपस्थित होत्या. भविष्यात उज्ज्वल यशासाठी व चांगल्या नोकरीच्या संधीसाठी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात प्रा. विनोदकुमार प्रधान यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी व विविध क्षेत्रातील संधींसाठी इंग्रजीच्या अभ्यासाचे महत्व पटवून दिले.अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. कार्यशाळेचे संयोजक डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले. डी. जी. घोडके यांनी आभार मानले. नम्रता ताटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. के. वाघमारे, डॉ. डी. सी. कांबळे, प्रो. डॉ. ई. बी.आळवेकर उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
कोल्हापूर, रविवार, दि. २० मार्च २०२२

# डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात 'आपत्कालीन व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. एस. ढेकळे होते. यावेळी रूपेश खरवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. संजय कांबळे यांनी व्याख्यान देऊन प्रात्यक्षिकाचे सादरीकरण केले. डॉ. पी. के. वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. संजय झुटाळ, तुषार हेगडे, सुकुमार उंदुरे, अनिल पवार आदी उपस्थित होते. सुप्रिया उळे हिने सूत्रसंचालन व डॉ. मधुमती शिंदे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner